

# ध्येय अंतरीचे

'रूप पालटू देशाचे' हा मंत्र ज्यांच्या ओठी आहे, अशा ध्येयवेड्यांची संघटना म्हणजे ज्ञान प्रबोधिनी. या संघटनेचे शिल्पकार कै. वाचस्पती अप्पासाहेब पेंडसे! अप्पांनी ओळखले होते की या राष्ट्राच्या कणाकणात नवचैतन्य उसळून यायचे असेल, या समाजाचे पुनरुत्थान व्हायचे असेल तर या समाजाच्या प्रश्नांचा वेध घेणारे, त्या प्रश्नांना थेट भिडणारे आणि त्या प्रश्नांची उकल करत त्यांना योग्य उत्तरे शोधणारे नेतृत्व येथे निर्माण झाले पाहिजे. असे समाजाभिमुख व समर्पित नेतृत्व या समाजातील बुद्धिमान मुलांमुलींमधून निर्माण करता येईल असा त्यांचा दृढ विश्वास होता.

प्रबोधिनीत शिक्षण घेतलेल्या या मुलांमुलींजवळ तीक्ष्ण तर्कबुद्धी असेल; नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा असेल; अथक परिश्रम करण्यास सिद्ध असणारी शरीरसंपदा असेल; संवेदनशील मन असेल; समृद्ध भावकोष असेल; 'स्व' च्या मर्यादा ओलांडून समष्टीपर्यंत विस्तारणारी जाणीव असेल; सभोवतालच्या समस्यांचा वेध घेणारी दृष्टी असेल आणि या समस्यांच्या मुळाशी भिडत त्यांच्यावर विजय मिळवू पाहणारी विजिगीषु वृत्ती असेल आणि त्यासाठी लागणारी मनुष्यशक्ती व साधनशक्ती गोळा करण्याचे संघटनचातुर्य असेल. या साऱ्याच्या बळावर ते राष्ट्रघडणीच्या कार्यातील अग्रदूत ठरतील. परिस्थितीच्या हातातील बाहुले न बनता, परिस्थिती आपल्याला हवी तशी बदलत राष्ट्रजीवनावर स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे असे नेतृत्व येथे निर्माण व्हावे यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे अस्तित्व! ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील शिक्षण हे त्याचे एक साधन! स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील 'देशपरिस्थिती बदलून टाकणारे' शेकडो तरुण-तरुणी निर्माण करणे हा प्रशालेतील शिक्षणाचा मुख्य हेतू!

म्हणूनच ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील शिक्षण म्हणजे दुपारी अकरा ते पाच असे घड्याळाच्या चौकटीत कोंबलेले शिक्षण नव्हे. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील शिक्षण म्हणजे परीक्षेतील गुणांसाठी केलेली जीवघेणी स्पर्धा नव्हे. तर ज्ञान प्रबोधिनीतील शिक्षण म्हणजे एक निरंतर प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया विद्यार्थी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर संपू नये असे प्रबोधिनीला वाटते. त्याच्या पुढील आयुष्यात ज्ञान प्रबोधिनी त्याच्या राष्ट्रीय स्फूर्तीचा झरा ठरावी.

ही ध्येये अंतरी बाळगून गेली तीन दशके ज्ञान प्रबोधिनीची वाटचाल सुरू आहे.

## बहुपुस्तकी अध्यापन

शास्त्र व गणित हे विषय एखाद्या विशिष्ट पुस्तकाच्याच साहाय्याने शिकवले पाहिजेत असा आग्रह धरलेला नाही. उलट अध्यापकांनी व मुलांनी अनेक पाठ्यपुस्तके व संदर्भपुस्तके वाचावीत अशी अपेक्षा असते.

### प्रकल्प

विविध प्रकारचे प्रकल्प करत असताना मुलांच्या विचार-कौशल्यांचा विकास होतो असे अनेक शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.



ज्ञान प्रबोधिनीतील शिक्षणात प्रकल्पांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. माहिती, वस्तू यांचे संकलन करणे, प्रतिकृती बनवणे, सर्वेक्षण करणे, संशोधन करून समस्या सोडवणे, मुक्त प्रयोग करणे, कथाकवितांसारखी नवनिर्मिती करणे असे अनेक प्रकल्प विद्यार्थी करतात. यातून मुले माहिती मिळवण्याची, तिच्यावर प्रक्रिया करण्याची कौशल्ये शिकतात. त्यांच्या जोडीनेच त्यांच्यातील वैज्ञानिक वृत्ती, चिकित्सक वृत्ती, प्रतिभा आणि हस्तकौशल्ये विकसित होत जातात.

## अन्य कौशल्ये

शाळेच्या वेळापत्रकात विषयांच्या तासांबरोबरच अन्य कौशल्ये शिकवण्याच्या तासांचाही समावेश असतो. मुलांनी उत्तमोत्तम पुस्तके वाचली तर त्यांच्या भावना समृद्ध होतात. प्रशालेत वाचनकौशल्ये शिकवली जातात. चाळीस हजार पुस्तकांनी समृद्ध असलेले ग्रंथालय व स्वाध्यायासाठी असणारी शांत अभ्यासिका हे प्रशालेचे भूषण आहे.

## घडवू शतपैलू बुद्धीचे


ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही बुद्धिमान मुलांसाठी चालवलेली शाळा आहे. परंतु ज्ञान प्रबोधिनीची बुद्धीची कल्पना शालेय विषयातील बुद्धिमत्ता इतकी मर्यादित नाही. बुद्धी बहुजिनसी आहे व तिचे अनेक पैलू आहेत. हे पैलू प्रत्येक व्यक्तीत कमी - अधिक प्रमाणात विकसित झालेले असतात व सध्याच्या रूढ शालेय अभ्यासक्रमात यांपैकी फारच थोड्या पैलूंना प्रकट होण्याची संधी मिळते. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीच्या अप्रकट क्षमता दाखवण्यास वाव मिळावा अशी भूमिका आहे.



विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन केले पाहिजे. वाचनकौशल्याच्या जोडीनेच प्रतिभाविकसन, अभ्यासकौशल्ये, वक्तृत्वकौशल्ये यांचेही प्रशिक्षण दिले जाते.

## अभिव्यक्ति विकास

प्रत्येक विद्यार्थी काही उत्तम कलाकार होऊ शकत नाही; परंतु प्रत्येक विद्यार्थ्याला कलेचा आस्वाद घेता आला पाहिजे. त्याची अभिरुची उत्तम असली पाहिजे. कलेतील अभिजात व चिरकाल टिकणारे काय आहे ते त्याला ओळखता आले पाहिजे. जर अशी अभिरुची निर्माण करता आली तर त्याला कोणत्यातरी माध्यमातून प्रभावी रीत्या अभिव्यक्त होता येईल. यासाठी अभिव्यक्ती विकसन तासिकांचा समावेश प्रशालेच्या वेळापत्रकात केला आहे. या तासिकांमधून मुलांमुलींपर्यंत कलेची दृष्टी व कौशल्ये पोहोचवण्याचा प्रयत्न केला जातो.



## परिस्थितीज्ञान

पाठ्यपुस्तकातून होणारे ज्ञानाचे दर्शन हे छोट्या खिडकीतून होणारे दर्शन आहे याची प्रबोधिनीला जाणीव आहे. देशविदेशांत अनेक घटना घडत असतात, नवनवी स्थित्यंतरे होत असतात. मतमतांतरे व त्यातून होणारे वादविवाद असतात. या साऱ्यांचा आपल्या जीवनाशी थेट संबंध आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. आपण घेत असलेले शिक्षण ज्या वास्तव जगात उपयोगात आणायचे आहे;

त्या जगाचे भान आठवी-नववीपासून यायला पाहिजे. सभोवतालची परिस्थिती पाहून मनात प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. त्यांची उत्तरे शोधण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. आपली मते इतरांना सांगितली पाहिजेत. इतरांची मते ऐकून त्यावर प्रतिक्रिया दिली पाहिजे. म्हणजे मग अध्ययनाची प्रक्रिया सार्थ होते. यासाठी प्रशालेत परिस्थितिज्ञानाचे तास असतात. या तासांना कधी शाळेबाहेरचे तज्ज्ञ व्याख्यानांसाठी येतात तर कधी प्रबोधिनीचे कार्यकर्ते वा विद्यार्थीच अभ्यास करून चर्चा करतात.

## सहाध्यायदिन-अभ्यास सहली


विद्यार्थ्यांच्या बुद्धीला खाद्य द्यायचे असेल तर त्यांना नवनवे अनुभव द्यावे लागतात. कारखाने, संशोधनसंस्था, विकासप्रकल्प, रुग्णालये यांसारखी आधुनिक तीर्थक्षेत्रे त्यांनी पाहावी लागतात. या ठिकाणी काम करणाऱ्या



कर्मचाऱ्यांपासून ते या प्रकल्पांच्या शिल्पकारांपर्यंत सगळ्यांशी गप्पा माराव्या लागतात. यातून मुलां-मुलींपुढची धूसर क्षितिजे स्पष्ट व्हायला मदत होते. व्यक्तिगत पराक्रमांचे आदर्श निश्चित व्हायला लागतात. म्हणूनच प्रबोधिनीत वर्गाच्या चार भिंतींच्या आत होणाऱ्या शिक्षणाइतकेच वर्गाबाहेरच्या या शिक्षणाला महत्त्व आहे.

## काया ही पंढरी

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण विचारात बौद्धिक विकासाइतकेच शारीरिक विकासालाही महत्त्व आहे. ज्या शरीराने आयुष्यभर काम करायचे ते तंदुरुस्त राहण्यासाठी विद्यार्थीकाळापासून प्रयत्न केले पाहिजेत. शाळेतील पुस्तकी शिक्षणानंतर संध्याकाळी दीड तास शारीरिक शिक्षण दिले जाते.



## दैनंदिन दले

युवक-युवती विभागांमार्फत चालविली जाणारी सायंकालीन दले प्रबोधिनीचा गाभा आहे असेच म्हणावे लागेल. दलांवर विद्यार्थ्यांना संचलन,योगासने,मल्लखांब यांचे पद्धतशीर शिक्षण दिले जातेच.परंतु पोहणे, कबड्डी, खोखो यांसारखे देशी खेळ व फुटबॉल-हॉकीसारखे विदेशी खेळ यांचेही प्रशिक्षण दिले जाते. जिंकण्यासाठी खेळण्याइतकेच प्रसन्नता मिळवण्यासाठी खेळणे महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न असतो.

## क्रीडा शिबिर

हिवाळयात निवासी क्रीडा शिबिरे योजली जातात. अशा शिबिरांतून विद्यार्थ्यांकडून विविध व्यायाम प्रकार करवून घेतले जातात. अशा शिबिरांत विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता कसाला लागतात. स्वतःच्या शरीरातील क्षमतांचा शोध लागणे हेही एक शिक्षणच आहे.

## साहस सहली

कणखर शरीर व मन ही प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांची भूषणे असली पाहिजेत असे वाटते. शरीर आणि मन ही दोन्हीही जेथे कसाला लागतात असा उपक्रम म्हणजे साहससहली. डोंगरदऱ्यांची वाट चोखाळत काढलेल्या या सहली आरामगाडीतून काढलेल्या सहलींपेक्षा नक्कीच कष्टप्रद असतात परंतु मैलोन्मैल पाण्याशिवाय वाट तुडवणे, अंधाऱ्या रात्री गडकोट सर करणे यातून शरीर टणक बनते. याबरोबरच सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर घडलेल्या इतिहासातून स्फूर्ती मिळते आणि ग्रामीण प्रदेशाची ओळखही होते. वर्षातून दोन तीन तरी अशा सहली निघतात.



## समाजदर्शन

आठवी-नववीतल्या विद्यार्थ्यांना वर्षातून काही दिवस तरी ग्रामीण भागात जावे लागते. या भागातल्या समवयस्क अथवा त्यांच्यापेक्षा लहान मुलांमुलींच्या शिक्षणाची परिस्थिती त्यांच्या लक्षात आणून दिली जाते. यातून मागे पडलेल्या समाजघटकांविषयी सहसंवेदना निर्माण होते.

## तंबूतील शिबिरे

निसर्गसान्निध्यात वास्तव्य, स्वावलंबी बनवणारा दिनक्रम, श्रमाची प्रतिष्ठा शिकवणारी श्रमकार्ये, डोळे उघडणारे परिसरातील ग्रामीण



वास्तव, शेकोटीभोवती बसून गायलेली पद्ये आणि ध्येयवादी कार्यकर्त्यांबरोबर रात्री जागून केलेले संकल्प . असे असते तंबूतले शिबिर. पुस्तकातल्या शब्दांपेक्षा हे अनुभव जास्त बोलके असतात.

## कथाकथनातून इतिहास शिक्षण

इतिहास अध्यापनाचा प्रेरणाजागरण हा एक महत्त्वाचा हेतू प्रबोधिनीत मानला गेला आहे. पाचवीत छत्रपती शिवरायांचे चरित्र, सहावीत मराठ्यांचा आणि राजपुतांचा इतिहास तर सातवीत शिखांचा इतिहास गोष्टी ऐकत विद्यार्थी शिकतात. जागतिक इतिहासाचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी या देशाच्या पराक्रमाचा इतिहास विद्यार्थ्यांच्या मनी ठसला जावा हा या खटाटोपाचा उद्देश.

## पालखी - गणेशोत्सव

या समाजाच्या परंपरांचा, सण-उत्सवांचा परिचय व्हावा म्हणून विद्यार्थी वारकऱ्यांबरोबर दिंडीत सहभागी होतात. अभंग गाता गाता वारकऱ्यांची विठ्ठल भक्तीची धुंदी मनाला स्पर्श करून जाते. या विठुरायाने साऱ्या महाराष्ट्राला शेकडो वर्षे वेड का लावले याचा विद्यार्थी अंतर्मुख होऊन विचार करू लागतो. गणेशोत्सवाचे नको त्या दिशेने बदलते स्वरूप पाहून बेचैन झालेल्या अप्पासाहेबांनी समाजाला शिस्तबद्ध मिरवणुकीचा आदर्श घालून द्यायचे ठरविले आणि गेली अनेक वर्षे प्रबोधिनीचे सर्व लहानथोर सदस्य वीरश्रीयुक्त असे बरचीनृत्य करत गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतात.

## मन विशाल समृद्ध बनावे

प्रबोधिनीतील बुद्धिकौशल्यांच्या विकासाइतकेच किंबहुना थोडे अधिकच महत्त्वाचे काम म्हणजे मनांची मशागत. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना अन्यायाची चीड आली पाहिजे आणि दीनदुबळयांच्या दुःखदर्शनाने त्यांचे मन हेलावून गेले पाहिजे. भावकोषाच्या समृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आखता येणे अवघडच.पण प्रशालेत अनेक उपक्रमांतून असे वातावरण निर्माण केले जाते की त्यातून विद्यार्थ्यांची मने आपोआपच घडत

## व्यक्तिकार्य - जोडकार्य - गटकार्य

दिलेले उद्दिष्ट एकट्याने, जोडीने अथवा गटाने पूर्ण करणे यासाठी आवश्यक ती साधने जुळवावी लागतात; नियोजन करावे लागते; इतरांचे सहकार्य मिळवावे लागते, उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यूहरचना करावी लागते आणि चिकाटीने दिलेल्या वेळात उद्दिष्ट गाठावे लागते. त्यासाठी कधी मर्यादित धोकाही पत्करावा लागतो. सामूहिक बुद्धिमत्तेचा उपयोग करावा लागतो. विद्यार्थ्यांना एका अनुभवाच्या काठाशी सोडून देऊन त्या अनुभवातून ते कसे जातात याचे विश्लेषण त्यांच्यापर्यंत पोहोचवत शिक्षण देण्याचा हा उपक्रम!


## वर्गबैठक

वर्गातल्या मुलांनी महिन्यातून एकदा एकत्र जमायचे. ठरवलेल्या विषयावर चर्चा करायची. महिन्याभरात वर्गात घडलेल्या घटनांवर आपली मते मांडायची. यातून एखाद्या विषयावर सर्व बाजूंनी विचार कसा करावा ते मुलांना कळते. अशा बैठकीचा समारोप मग वर्गमार्गदर्शक अथवा ज्येष्ठ कार्यकर्ते करतात.

## जन सुसंघटनार्थ विणावे

**'व्यक्ती-व्यक्ती जमवून भवती कार्य करणे पुरुषार्थी'**

असा सुसंघटित पराक्रम करायचा असेल तर संघटनेचे शास्त्र शिकायला लागते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत या शास्त्राची काही अंगे मुलांना परिचित करून दिली जातात. यातून विद्यार्थ्यांना नियोजन कौशल्ये, गटात काम करण्याची कौशल्ये यांसारख्या कौशल्यांची ओळख होते. संघटनेत काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वृत्तीची घडण होते.



## पथक पध्दती

५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना परस्परांत सुसंवाद साधत एकत्र काम करता आले पाहिजे. त्यासाठी भिन्न वये असली तरी परस्परपूरक ठरत कार्यक्रम आखता आले पाहिजेत, जबाबदाऱ्या पेलता आल्या पाहिजेत यासाठी प्रशालेचे अनेक उपक्रम पथकशः पार पाडले जातात.

## विस्तार शिबिरे

नेतृत्व करून पाहण्याचा अनुभव या शिबिरांमधून विद्यार्थ्यांना मिळत असतो. बाहेरगावी जाऊन चाळीस-पन्नास अनोळखी मुलांमुलींना एकत्र करून त्यांचे शिबिर घ्यायचे ही कल्पनाच आह्वानात्मक आहे. आपल्या महाविद्यालयीन मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली दर वर्षी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रबोधिनीची आठवी-नववीतील मुले-मुली अशी शिबिरे घेतात. वर्षभरात शिकलेल्या अनेक कौशल्यांचा उपयोग करण्याची संधी या निमित्ताने मिळत असते.

## साप्ताहिक उपासना

दर शनिवारी सकाळी विद्यार्थी पवित्र वातावरणात सामूहिक उपासना करतात. उपासनेच्या मध्यंतरात ध्यान करताना त्यांनी 'स्व' पासून ते राष्ट्रापर्यंत चिंतन करावे असे त्यांना सांगितले जाते. अशी उपासना त्यांनी दररोज करावी अशी इच्छा असते.

## वर्षारंभ व वर्षान्त उपासना

ज्ञान प्रबोधिनीचे प्रत्येक नवे वर्ष नवनवी आव्हाने पेलण्याचे असते. अशा वर्षाची सुरुवात विद्यार्थी संकल्पयुक्त उपासना करून करतात. तर वर्षान्त उपासनेत वर्षभरातील आपल्या यशापयशाचा आढावा घेतात. या दोन्ही उपासनांमधून विद्यार्थ्यांना ते करत असलेल्या ज्ञानयज्ञाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न असतो.

## दीक्षाग्रहण अथवा विद्याव्रत संस्कार

विद्याव्रत संस्कार हा ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहे. इयत्ता आठवीतील मुलांमुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दिशा दाखवणारी एक व्याख्यानमाला आयोजित केली जाते. त्यानंतर विद्यार्थी आईवडील, गुरुजन व ज्येष्ठ व्यक्तींच्या उपस्थितीत विद्याव्रताचा स्वीकार करतात. आयुष्यात विद्याग्रहण आणि ईश्वराचे चिंतन अशी दोनच व्यसने लावून घेण्याचा संकल्प या निमित्ताने विद्यार्थी करतात.

## चिदानंदरूपी शिव मी शिव मी

धर्मविचार आणि ईशचिंतन यांत सनातन्यांतील सनातनी व शास्त्र आणि उद्योगविचार यांत आधुनिकांतील आधुनिक असे ज्ञान प्रबोधिनीच्या भूमिकेचे वर्णन करता येईल. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या साऱ्या कर्तृत्वाला आध्यात्मिक बैठक असावी असा आग्रह येथे धरला जातो. विविध उपासनांद्वारे विद्यार्थ्यांना ईशचिंतनाचा मार्ग दाखवला जातो.



## संलग्नता

वर उल्लेख केलेली शैक्षणिक भूमिका असणारी ज्ञान प्रबोधिनी प्रशाला इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतची शाळा आहे. ती दिल्लीच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (CBSE) संलग्न आहे.

## प्रवेश प्रक्रिया

इयत्ता पाचवीमध्ये मुलांमुलींना प्रवेश दिला जातो. त्यासाठी मार्च महिन्याच्या पहिल्या रविवारी चाचणी घेतली जाते. या चाचणीसाठी इयत्ता चवथीतील मराठी अथवा इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी बसू शकतात. चाचणी फक्त पुण्यातच प्रबोधिनीच्या वास्तूत होते.

## माध्यम

माध्यमभाषा म्हणून एकाच भाषेचा उपयोग केला जात नाही. मराठी माध्यमातून चवथीपर्यंत शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीचे व इंग्रजी माध्यमातून शिकलेल्या विद्यार्थ्यांसाठी मराठीचे जास्त तास ठेवले जातात.

| इयत्ता | माध्यम | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| ५,६ | मराठी<br>इतिहास<br>संस्कृत | हिंदी<br>भूगोल | इंग्रजी<br>शास्त्र<br>गणित |
| ७,८ | मराठी | हिंदी,संस्कृत<br>इतिहास,भूगोल<br>ना.शास्त्र | इंग्रजी<br>शास्त्र<br>गणित |
| ९,१० | | संस्कृत<br>सामाजिक अध्ययन | इंग्रजी,<br>शास्त्र,<br>गणित |

संस्कृत भाषा इयत्ता पाचवीपासून शिकवली जाते. विषय चांगले समजावेत म्हणून पाचवी व सहावीत मराठी भाषेचा उपयोग केला जातो. वरती दिलेल्या तक्त्यात विषय व त्यांची माध्यमे दिली आहेत.

## मूल्यमापन

मासिक घटकचाचण्या, वर्गचाचण्या, प्रात्यक्षिक कार्य, गृहकार्य, प्रकल्प यांच्या साहाय्याने वर्षभर निरंतर मूल्यमापन केले जाते. त्याचबरोबर सहामाही परीक्षा व वर्षान्त परीक्षा अशा दोन मोठ्या परीक्षा असतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेताना वर्षभरातील कामाचा विचार होतो.

## गणवेश

मुलांसाठी पांढरी सुरवार, गुलाबी झब्बा व पांढरी गांधी टोपी, मुलींसाठी पांढरी सलवार, फिका निळा कुडता व पांढरी ओढणी. रिबिनी वापरायच्या असल्यास त्या निळ्या रंगाच्या असाव्यात.

गणवेश आठवड्यातून एकदा व विशेष प्रसंगी घालायचा असतो. अन्य दिवशी साधेपणा प्रतीत होईल असा वेश घालणे आवश्यक आहे.

## बाहेरील परीक्षा

विद्यार्थ्यांना बाहेरील परीक्षांना बसण्यास परवानगी असते. मात्र त्यांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था दर वर्षी शाळेतून होईलच याची निश्चिती नाही.

## वसतिगृह

फक्त मुलांसाठी मर्यादित संख्येचे वसतिगृह ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने चालवले जाते.

## समारोप

ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक भूमिका या माहितीपत्रकात स्पष्टपणे मांडली आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणापलिकडचे काही देण्याचा प्रयत्न येथे केला जातो. त्यासाठी विद्यार्थी खूप वेळ शाळेच्या उपक्रमांसाठी देत असतात. त्यांचा हा वेळ वाया जात नसून त्यातून त्यांचे शिक्षणच होत असते. प्रबोधिनीच्या सर्वच उपक्रमांत विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभागी झाले पाहिजे अशी अपेक्षा आहे. परंतु वर उल्लेखलेले व अन्यही उपक्रम हे विद्यार्थ्यांनी एकाच वर्षी करावयाचे नसतात. टप्प्याटप्प्याने त्यांची ओळख व त्यातील सहभाग वाढवत नेलेला असतो. त्यातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसंबंधी काही अडचण निर्माण झाली तर प्रशालेतील अध्यापक वा अन्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढता येतात. प्रबोधिनीच्या सर्वच अधिकाऱ्यांचे व अध्यापकांचे विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संबंध असतात. त्यामुळे मोकळेपणाने अडचणी मांडण्याचे स्वातंत्र्य मुलांमुलींना व पालकांना येथे आहे. ज्ञान प्रबोधिनीचे कार्य व्यापक राष्ट्रीय भूमिकेतून चालणारे कार्य आहे. हे कार्य स्वाश्रयी असावे असा आग्रह असल्याने शाळेसाठी कोणतेही शासकीय अनुदान घेतले जात नाही. त्यामुळे अनुदानप्राप्त शाळांपेक्षा येथे अधिक शुल्क द्यावे लागते परंतु गरजू व बुद्धिमान विद्यार्थ्यांना येथे विनाअडचण शिक्षण घेता यावे अशी मर्यादित व्यवस्था शाळेने केली आहे.

स्वामी विवेकानंदांनी सांगितलेल्या आदर्शाच्या आधारे येथील मनुष्यघडणीचे शिक्षण चालले आहे; या शैक्षणिक व्रतात तन-मन-धनपूर्वक सहभागी होणाऱ्यांचे येथे स्वागतच आहे. फक्त स्मरण ठेवायचे -

**की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने**
**लब्ध-प्रकाश-इतिहास-निसर्गमाने**
**जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे**
**बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ॥**

**प्रशालाविषयी अन्य काही**

**ज्ञान प्रबोधिनी प्रशाला**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
२४४७७६९१,२४४७८०९५ फॅक्सः२४४९१८०६
www.jnanaprabodhini.org
e-mail : prabodhini@vsnl.com
prashala@jnanaprabodhini.org